**Theme: Leadership for Equity, Diversity and Inclusion**

**Smt. Usha Sudharkar Dole**
Head Mistress
Kendriya Prathmik Shala Amashi, Kolhapur, Maharashtra
Email id: ushadole9@gmail.com
Mobile no.: 9011267726/ 9421817726

**सुस्वागतम**
**Celebrating School Leadership**
**Participate by Headmistress,**
**Kendriy Prathmik Shala**
**Amashi,Tal Karveer , Dist Kolhapur**



**प्रस्तावना**

**सुंदर हिरवळ, फेसाळणारे कुंभी नंदीचे पाणी, रस्त्याच्या तुतर्फा झाडी, पायऱ्या पायऱ्यांची मनाला आकर्षण घेणारी शेती, मनाला भावनिक साद घालणारे काळम्मा देवीचे मंदीर, संताची, कुस्तीगिरांचे, दानशुरांचे, सदन नोकरदार वर्गांचे मनाने श्रीमंत असणाऱ्या लोकांचे आमशी गाव गावच्या एका कोपऱ्याला, शेतवाडीला चिकटून असलेली आमशी शाळा. शाळा तशी छोटीच. १ ली ते ४ थी पर्यंत ११४ पटाची. पण........ मुख्याधापिका सौ उषा सुधाकर डोळे यांचे नेतृत्वाखाली शाळेने घेलेली झेप तसे पहिले तर खपूच मोठी ! जुन २०२३ मध्ये मी केंद्रीय प्राथमिक शाळा आमाशी येथे हजर झाले. तेव्हा विद्यार्थी व पालक यांचे मनात अनास्था दिसून आली. यातून नवनवीन उपक्रम साकारले गेले.**

**अ) विभाग**

**१. शाळा परिसराचे सौंदर्गीकरण**

**वर्ग, शाळा सजावट -**

**मुलांनी टाकाऊ पासून टिकावू वस्तू तयार करून शाळा, वर्ग सजावट केली आहे. वर्ग, शाळा सुशोभिकरण, कुल्पकतेतून केले आहे. सुंदर, बोलकी शाळा, वर्ग, भिंती केल्या आहेत. विचार करायला लावणार, लावणार, प्रेरक चित्र, सुविचार भिंत, व्हरांडा वर्ग खोलीवर केले आहेत.**

**वृक्षांचे रोपण**

शाळेची इमारत इमारत दोन बाजूने आहे. दोन्ही बाजूस ३ फुटाचे अँगल टाकून बांधले आहेत. त्यामध्ये ऑक्सिजन वर्धक व उपयोगी अशी रोपटे, फुलझाडे, शोची झाडे, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ शिक्षकांनी लावली आहेत. त्यांची निगा राखणेसाठी वर्ग निहाय नियोजन केले आहे




संरक्षण भिंतीची रंगरंगोटी

शाळेच्या संरक्षण भिंतीवर पुढील बाजूस प्रेरक बोलकी व मार्गदर्शक चित्रे, घोषवाक्य, सुविचार लिहलेली आहेत. रंगरंगोटी आकर्षक करणेत आलेली आहे.

बोलक्या भिंतीची उभारणी -

वर्ग, शाळा, संरक्षण भिंतीवर सुविचार, चित्रे व बोलक्या भिंती बनवलेल्या आहेत. प्रेरक व मार्गदर्शक सुविचार चित्रे रेखाटलेने शाळेची शोभा वाढली आहे.

२. विद्यार्थ्यांचा उपक्रमात, व्यवस्थापनात, निर्णय प्रक्रियेत सहभाग

मंत्रिमंडळ व बालसंसद स्थापना -

शाळेत मंत्रिमंडळ व बालसंसद स्थापन केले आहे. मंत्रिमंडळ व बालसंसद यांच्या सभा दर दोन महिन्याला घेवून शालेय उपक्रम, व्यवस्थापन, प्रगती बाबत विद्यार्थी चर्चा करतात. त्याची प्रोसिडींग व फोटो बघायला मिळतात.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत नियोजन अंमलबजावणी विद्यार्थी सहभाग -प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत नियोजन व अंमलबजावणीत विद्यार्थ्यांचा वाटा खुप प्रेरणादायी आहे. विद्यार्थी ररांगेत, हात धुवून, ताटे घेवून जागेवर बसून (डायनिंग टेबलवर) आहार घेतात. नंतर ताटातील खरकटे बकेटात टाकून ताट विसळून घासणेसाठी एकत्र ठेवतात. अन्नाचा दुरुपयोग होवू नये म्हणून एकमेकांना सुबना देतात.

• परसबाग निर्मिती -

विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनतीने मोठ्यांच्या मदतीने परसबाग वनस्पती, फळभाज्या असे टप्पे केले आहेत

परसबागेत भाज्यांतील जिवनसत्त्व व उपयोग भिंतीवर लिहले आहे.



औषधी वनस्पतीचे उपयोग लिहले आहेत. आरोग्यवर्धक भाज्या मेथी पालक फ्लावर, कोबी, मिरची, वांगी, टोमॅटो, मसाता झाडे, तिवू लावले आहेत.

• माझी माटी मेरा देश -

ग्रामपंचायत आमशी व केंद्रशाळा आमशी यांनी एकत्रितपणे खूप उत्कृष्ट पध्दतीने हा उपक्रम राबवला आहे अमृतकलश यात्रेत महिला ग्रामस्थांकडून माती दान म्हणून सुपातून विद्यार्थ्यांनी स्विकारती आहे. ती माती अमृतवाटीका निर्माण करून तिथे टाकली आहे. त्या दान घेतलेल्या मातीवर विद्यार्थ्यांनी अमृतवाटीका तयार केली बचत बँक / पैशाच्या विनियोग व व्यवस्थापन

विद्यार्थ्यांना शिक्षकांनी पतसंस्थेत नेवून बचतीचे महत्त्व पटवून दिले. बँकेत खाते उघडून पैसे विद्यार्थी नावे खात्यावर भरले जातात. तसेच त्याचे खतावनी किर्द, लिखित स्वरुपात नोंदी आहेत.

• नवभारत साक्षरता अभियान -

मुख्याध्यापक लिंक वरुन शिक्षकांना व शिक्षकांनी स्वयंसेवकांना ॲड करुन घेतले आहे. उल्हास ॲप द्वारे टॅगिंग करुन टार्गेट पूर्ण केले आहे.

३. शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक अवांतर उपक्रम

उपस्थिती -
विद्यार्थी उपस्थिती प्रमाण चांगले आहे. उपस्थिती ध्वज मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा सुरु असते उपस्थिती ध्वज मिळाले नंतर वर्ग शिक्षक व विद्यार्थ्यांचा चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा असतो

• महावाचन चळवळ विद्यार्थी सहभाग -
शाळेत अतिशय जुने पिंपरीचे ११५ वर्षापुर्वीचे झाड आहे. झाड खुप आकर्षक, मनाला भुरळ पाडणारे बघताच क्षणी दिसते त्या झाडाखाली तर कधी व्हरांड्यात मैदानावर महावाचन चळवळीचे आयोजन देसाई मॅडमनी केलेले दिसते महावाचन चळवळीत विद्यार्थी सकारात्मक चर्चा व पुस्तके देव घेव करतात शिवाजी महाराजा याबद्दल चर्चा करतेवेळी मला विद्यार्थी दिसून आले.

NCC/Scout Guide/MCC समान इतर उपक्रमातील विद्यार्थी सहभाग -
शाळेतील विद्यार्थ्यांची कबबुत बुल घटकात नोंदणी केली आहे. तसेच योगासने, मिश्र कवायत व्यायाम प्रकार कराटे प्रशिक्षण मुलांना दिले जाते.

इमारत व परिसर स्वच्छता -
I इमारत व परिसर स्वच्छता विद्यार्थ्यांमार्फत राखली जाते. स्वच्छता मोनिटर लिंक भरली असून ८० व्हिडीओ अपलोड केलेले आहेत प्रश्नावली तपार केली आहे

राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देण्याबाबत उपक्रम -
राष्ट्रीय एकात्मता मुल्याची जोपासना करण्यासाठी मुलांना केरळ राज्याची ओळख करुन दिली आहे. रसिका देसाई मॅडमनी केरळ राज्याचा नकाशा, ओळख, माहिती, वेशभुषा, खानपान दाखवले. करुन घेतले आहे.

क्रिडा स्पर्धाचे आयोजन -
शाळा स्तरावर देशी खेळ घेतले जातात. खो खो खेळात तालुका स्तरापर्यंत तर कुस्ती खेळात जिल्हास्तरापर्यंत मजल विद्यार्थ्यांनी मारली आहे.

व) विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांचे आयोजन

१. आरोग्य

आरोग्य तापसणी -
शाळेत विद्यार्थी शिक्षक व ठेकेदार मदतनीस यांची आरोग्यतपासणी केली आहे. शिक्षक, ठेकेदार, मदतनीस आरोग्य तपासणीचे प्रमाणपत्र आहे. संदर्भ सेवेसाठी

मुलांना पुढे पाठवते आहे. संदर्भ सेवामधून अपंग विद्यार्थी प्रमाणपत्र काढणेसाठी मदत झाली आहे.

**प्रथमोपचार पेटी -**

प्रथमोपचार पेटीचे रासायनिक औषधे व आयुर्वेदिक औषध असे दोन भाग केले आहेत. आयुर्वेदिक औषध आजीचा बटवा म्हणून प्रसिध्द झाले. आजीचा बटव्यात - वैवा, लसून, आले, तुप, जिरे, मेथी, हिंग, बडीशेप तवंग, मीठ, साखर, लिंबू ठेवले. रासायनिक औषधामध्ये कापूस, जखमेवरची औषधे, मलम जखम धुणेसाठी औषधे, कात्री पट्टी आदी ठेवले.

**मार्गदर्शनपर व्याख्यान -**

लठ्ठपणा, मधुमेह व डोळ्यांचे आजार वर ३ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले. एक सरकारी डॉक्टर बाटे, एक खाजगी डॉक्टर जाधव व एक आयुर्वेदीक डॉक्टर पाटीत असे तीन व्यक्तींनी माहिती मुलाना दिली

**किशोरवयीन मुलींना मासिक पाळी समोपदशेन -**

मातांना मासिक पाळी संदर्भात मुख्याध्यापिका डोळे यु. एस. यांनी समुपदेशन केले पोक्सो कायदा मार्गदर्शन व व्हीडीओ दाखवली गुड टच बॅड टच माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

**हात धुण्याचे प्रात्यक्षिक-**

शाळेत सुंदर, आकर्षक, स्वच्छ हॅण्डवॉश स्टेशन आहे. हात धुण्याचे प्रात्यक्षिक गाण्याच्या तालावर घेण्यात आले. स्वच्छतेचे आठ संदेश लिहले आहेत. मुले सांगतात. हॅन्डवॉश व चित्र रुपाने संदश दिले आहेत.

**२. आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास -**

**• बँक व्यवहार UPI साधनांचा वापर -**

आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास साठी के.डी.सी.सी. बँक आमशी शाखेला शिक्षक विद्यार्थी भेट देण्यात आली. यावेळी बँक मॅनेज नी विद्यार्थ्यांना बँक माहिती व बचतीचे महत्त्व पटवून दिले. कामकाजाची माहिती सांगितली

श्री दिलीप यशवंत पाटील (माजी अध्यक्ष) यांच्या किराणा दुकानास भेट देवून UPI चे ट्रांझेक्शन विद्यार्थ्यांकडून करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक द्वारे UPI माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. स्वयंरोजगार, व्यवसाय, व्यापार, उद्योग अशा क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन -

पत्रकारीता माहिती -

श्री. मोरे सर (कोगे) व श्री. अशोक पाटील आमशी या पत्रकारांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. मावेळी पत्रकारीतेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली

पशुवैद्यकीय डॉक्टर -

डॉ प्रकाश रामबंद्र पाटील (अध्यक्ष शाय. कमिटी आमशी) हे स्वतः पशुवैद्यकीय डॉक्टरचे कर्तव्य व महत्त्व तत्परता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. साप घालवण्यासाठी जनावरांबी नखे व शिंगाचा वापर, टायरचा वापर सांगितला.बांधकाम मार्गदर्शन -

श्री योगेश बचाटे यांनी बांधकाम सदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते स्का सिव्हीत इंजिनियर आहेत त्यानी बांधकामासाठी कोणते साहित्य किती प्रमाणात वापरावे इथपासून ते इमारतीची वयोमर्यादा वाढवणे पर्यंत विद्यालयांना माहिती सांगितली

शैक्षणिक लोकसहभाग -

पूर्ण आमशी ग्रामस्थानी सढळ हाताने अर्थदान श्रमदान केलेले आहे ग्रामपंचायतचे सर्व मडक, तरुण मंडळ, पुढारी वर्ग बचत गट पालक, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, विद्यार्थी, सर्वांनी आपापल्या पध्दतीने श्रमदान केले आहे नाईट उयुटी करून दिवसभर कामाला/श्रमदानाला येणारी थोर मंडळी बघायला मिळाली.

शैक्षणिक लोकसहभागामधून एकूण आठ लाख बारा हजार अवघ्या २५ दिवसात केंद्रीय प्राथमिक शाळा आमशीने मिळवला आहे. शेतकरी व ग्रामीण भाग असून सुध्दा भरघोस मदत केली आहे.

या सर्वांच्या कष्टातून आमशी शाळाची भरभराट झालेली आहे. नटलेली आहे.

शाळा व्यवस्थापन समिती -

खरी अभियानाची सुरुवात या समितीनेच केली. मुख्याध्यापकांनी केलेले नियाजेन अभियानासाठी लागणारी सर्व तोपरी मदत मनुष्यबळ जमा करण्याचे काम. अगदी दिवसरात्र शाळेला या कमिटीने, शिक्षकांनी वाहून घेतले होते. कमी कालावधीत हे अभियान यशस्वी करुन दाखवले

४. तंबाखूमुक्त शाळा -

शाळेता तंबाखुमुक्त शाळा प्रमाणपत्र मिळालेले आहे. गावातील दुकानदारांना तंबाखु बंदी बाबत विनंती अर्ज केलेले आहेत. शाळेत तंबाखूमुक्तीचे बोर्ड आहेत. संरक्षण भिंतीवर चित्र आहेत.

प्लॅस्टिक मुक्त शाळा -

फक्त शाळाच नव्हे तर गाव सुध्दा प्लॅस्टीक मुक्त केलेला आहे. विद्यार्थ्यांनी रात्री, दिवसा गल्लोगल्लीत जाऊन प्लॅस्टीक हटवा, देश वाचवा अशा घोषणा देत प्लॅस्टीक गोळा केला आहे ते प्लॅस्टीक गोळा करणाराकडे सुपूर्त केले
शाळेच्या आवारात व कामकाजात प्लॅस्टीक चा वापर होणार नाही याची काळजी घेतली.

• शित्तक अन्नावर योग्य प्रक्रिया व विल्हेवाट -

एक तर शाळेत अन्न शिल्लक राहतच नाही. शिल्लक राहीलेब तर भात परतुन मुलांना दित्ता जातो. खरकटे, जनावरे प्राण्यांना टाकले जाते. काही कंपोस्ट खतात टाकत्ते जाते.

५. माझी विद्यार्थी, संख्या मदत -

माझी विद्यार्थी, सस्था महिला बचत गट पानी भरभरून मदत अभियानासाठी केली आहे. आजी आजोबा मेळाव्यातून २० मिनिटामध्ये आठ हजार रक्कम जमा झालेली आहे. त्यातून व्हरांडा रंगकाम केले.

संत रोहिदास समाजाकडून शाळेस फोल्डींग डायनिंग टेबल मिळाले आहे. या समाजाचे प्रमुख एन.टी. सातपुते सर यांनी यात पुढाकार घेवून फोल्डींग डायनिंग शाळेस तयार करुन दिले आहेत.

यशोगाथातील विशेष बाबी

१. फोल्डींग डायनिंग सिस्टीम -

**शहरी मेजवानीचा आनंद मुलांना मिळावा म्हणुन, शेतकऱ्यांची ग्रामीण मुलं त्यांना ही हॉटेलचा अनुभव घेता यावा यासाठी 'डायनिंग सिस्टीम संकल्पना राबवली. संत रोहीदास समाजाने एन.टी. सातपुते गुरुजी सेवा निवृत्त मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वाखाली पुर्ण करुन दिले.**



**२. परसबाग औषधी परसबाग, भाजीपाला बाग -**

**परसबाग सर्वच शाळेत राबवली, परंतु माझी परसबाग वैशिष्ट्यपूर्ण आहे. कमी जागेत योग्य नियोजन, ओषधी परसबाग भाजीपाला बाग आणि बागेतच मुलांना वावनासाठी काम करता करता लिहतेती जिवनसत्वाची माहिती, गुणधर्माची माहिती, औषधी वनस्पतीचा तात्काळ मुलांसाठी वापर करता येतो. पालकापर्यंत पोहचते**

३. शोषखड्डा-

घाणपाणी, सांडपाणी इतरत्र पसरून रोगराई होऊ नये पासाठी शोषखड्डा निर्मिती केली आहे

कपोस्ट खत -

वागतीत झाडांना लेंडीखत, कंपोस्ट खत तयार करून टाकले जाते. पाला पाचोळाव क्षरकटे, अन्न घटकापासून कंपोस्ट खत तयार केले आहे कंपोस्ट खड्डा निर्माण केला आहे.

५. गोमुत्र फवारणी -

परसबागेता किटक नाशक म्हणुन गोमूत्र फवारणी केली जाते. गोमुत्रची माहिती लिहलेती आहे. खिलार गाईचे गोमुत्र पुर्णपणे सेंद्रिय आहे.

५. नारळप्रसाद दान-

मंदीरात नारळ फोडलेनंतर तिथेच ठेवले जाते कधी कधीं भरपूर नारळ मंदीरात साठतात तेव्हा नारळप्रसार दान ची संकल्पना मला सुचती तसे पत्र लेटर पेंडवर पुजारी मामा व लराचे बंधू भगवान गुरव (ग्रा.पं. सदस्य) पाना दिले. तात्काळ यांनी सहकार्य दर्शवले.

मुख्याध्यापकांना बोलवून त्यांनी वेळोवेळी मंदीरातील प्रसार सुपातून मला दान केला. त्याचा वापर पोषण आहारात करण्यात आला. मुलांना पोष्टीक मिळाले. मुले म्हणजे देवा घरची फुलेच

७. बोलक्या भिंतीवरुन मौलिक विचारांचे प्रसारण -

बोलक्या भिंतवरुन लोकांपर्यंत मौलिक विचारांचे प्रसारण केले आहे. उदा. मोबाईल वापर व दुष्परिणाम इतर

८. गप्पी मासे, उपक्रम -

"गप्पी मासे पाळा नारु रोग टाळा वर्गखोल्यांना लागून शौचालये जागेअभावी बांधली आहेत. त्यापासून मच्छरचा त्रास वर्गांना होत असलेचे दिसून आले. तेव्हा गप्पी मासेची संकल्पना त्याठिकाणी राबवली आहे. गप्पी मासे चे फायदे आहेत.

९. शिल्लक अन्नावर प्रक्रिया -

- एक तर अन्न शिल्लक राहत नाही. राहिले तर
- भात परतून दिला जातो.
- खरकटे भूत दया म्हणून प्राण्यांना दिले जाते

- **सर्वच घटक शिल्लक राहिले तर गुळ चिंच वापरून रगडा करून मुलांना दिला जातो.**
- **उन्हाळ्यात मसाला भात शिल्लक राहिल्यास वाळवून चिवडा करून देता येतो.**
- **कंपुष्ट खत निर्मितीसाठी वापरतो**

**१०. प्रथमोपचार पेटीत्सोवत आजीचा वटवा**

**११. लोकसहभाग -अवघ्या २५ दिवसामध्येच आठ ताख बारा हजार लोक सहभाग मिळाला आहे.**

**१२. जनावरांची नखे, शिंग व टायरची धुरी साप येऊ नयेत म्हणून केली जाते.**

**१३. आमशी गावामध्ये एकात्मता निर्माण झाली आहे.**

**१४. लोकानी जमेल त्या पध्दतीने मदत केली आहे.**

**१५. घरातील दुखवटा बाजूला सारून आर्थिक मदत स्वतःहून केली आहे.**

**धन्यवाद**